बैंक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक

आज़ादी का अमृत महोत्सव

**निगमित संप्रेषण व निवेशक संबंध**
प्रधान कार्यालय : लोकमंगल, 1501, शिवाजीनगर, पुणे 5
टेली -020 :25614495, 25614366, 25514501 से 12 विस्तार

# वृत्तपत्रीय निवेदन

## बँक ऑफ महाराष्ट्र तर्फे सर्व कर्ज कालावधिच्या (एम सी एल आर) व्याजदरात ३५ बिंदूंची कपात

**पुणे दिनांक ११ जुलै २०२२** : देशाच्या सार्वजनिक बँकिंग क्षेत्रातील अग्रगण्य बँक असलेल्या बँक ऑफ महाराष्ट्रने दिनांक ११ जुलै २०२२ पासून आपल्या सर्व कर्ज कालावधिच्या व्याजदरात ( एम सी एल आर – सिमांतिक परिव्यय निधी आधारित कर्ज दर ) २० – ३५ बिंदूंची कपात केली आहे. .

बँकेने तीन महिन्यांच्या कर्जांच्या व्याजदरात ( एम सी एल आर – सिमांतिक परिव्यय निधी आधारित कर्ज दर ) आधीच्या ७.५५ % वरून ७.२० % एवढी कमाल कपात केली आहे.

सहा महिने व एक वर्षासाठी असलेल्या कर्जांच्या व्याजदरात ( एम सी एल आर – सिमांतिक परिव्यय निधी आधारित कर्ज दर ) अनुक्रमे २० बिंदूंची कपात करून आधीच्या ७.६० % वरून ७.४० % व ७.७० % वरून ७.५० % एवढी घट करण्यात आली आहे.

ओवरनाइट व्याजी व एक महिण्याचा कर्जांच्या व्याजदरात (एम सी एल आर – सिमांतिक परिव्यय निधी आधारित कर्ज दर ) अनुक्रमे २५ बिंदूंची कपात करून आधीच्या ७.१५ % वरून ६.९० % व ७.२५ % वरून ७.०० % एवढी घट करण्यात आली आहे.

एम सी एल आर – सिमांतिक परिव्यय निधी आधारित कर्ज दराशी जोडलेली निगमिय ( कॉर्पोरेट) कर्जे स्वस्त होऊन व्याजदरातील कपातीचा ग्राहकांना लाभ होईल.